Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Notice No. 211

Displayed on : 29/07/2022

30 JUL 2022

## कनिष्ठ महाविद्यालयातील अल्पसंख्यांक समाजातील गुणवंत मुलींसाठी बेगम हजरत महल राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजना याबाबतची महत्वाची सूचना.

शैक्षणिक वर्ष २०२२—२३ पासून अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी धार्मिक अल्पसंख्यांक समाजातील गुणवंत मुलींसाठी ''बेगम हजरत महल''राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २०२२—२३ पासून मुस्लीम, खिश्चन, शीख, पारशी, बौध्द व जैन या समाजातील गुणवंत मुलींसाठी इयत्ता ९ वी ते १२ वी पर्यंतच्या मुलींसाठी आहे. यासाठी ११ वी व १२ वीच्या मुलींसाठी ६०००/— रुपये शिष्यवृत्ती देण्यात येते.

सन २०२२—२३ या वर्षासाठी सर्व इच्छुक तसेच मागील वर्षाच्या लाभार्थी विद्यार्थीनींनी केंद्र शासनाच्या www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर आपले अर्ज केवळ ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे आहे. सन २०२१—२२ वर्षी ज्या विद्यार्थ्यांना अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी असलेली मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती मिळालेली आहे अशाच विद्यार्थ्यांनी आपले अर्ज Renewal Student म्हणून भरावयाचे आहेत.

(नूतनीकरण विद्यार्थ्यांची यादी शाळेच्या लॉगिनमध्ये उपलब्ध आहे.) तसेच पात्र नवीन इच्छुक विद्यार्थ्यांनी आपले अर्ज Fresh Student म्हणून भरावयाचे आहेत.

''बेगम हजरत महल''राष्ट्रीय शिष्यवृत्तीचे वाटप केंद्र शासनाकडून DBT (Direct Benifit Transfer) मोडव्द्रारे विद्यार्थीनांच्या खात्यावर होत असल्याने विद्यार्थीनींचे आधार कार्ड असणे आवश्यक आहे. आधार कार्ड नसेल तर आधार कार्डसाठी नोंदणी केलेली पावती किंवा बॅक पासबुक (छाया चित्रासह) किंवा रेशन कार्ड किंवा पॅन कार्ड किंवा पासपोर्ट किंवा महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी साक्षांकित केलेले फोटो सहित असलेले विद्यार्थीनींना ओळख प्रमाणपत्र महाविद्यालयात जमा करणे आवश्यक आहे.

बेगम हजरत महल राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजनेसाठीचे पात्रतेचे निकष व आवश्यक कागदपत्रे पुढीलप्रमाणे :—

१.शासनमान्यता प्राप्त सर्व व्यवस्थापनाच्या अनुदानित/विनाअनुदानित/स्वयंअर्थसहाय्यित शाळांतील इयत्ता ११ वी व १२ वी मध्ये शिकना—या अल्पसंख्यांक समाजातील पात्र विद्यार्थीनी.

२. मागील शैक्षणिक वर्षात ५० टक्के पेक्षा अधिक गुण असने आवश्यक आहे.

३. पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. दोन लाखापेक्षा कमी असावे.
४. उत्पन्नाचे प्रमाणपत्र हे सक्षम अधिका–याच्या सहीचे असणे बंधनकारक आहे.
५. एका कुटुंबातील दोन पेक्षा अधिक पाल्यांना या शिष्यवृत्तीचे लाभ घेता येणार नाही.
६. आधारकार्ड नंबर असणे तसेच बॅक खात्याशी जोडणे आवश्यक आहे.
७. इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला नसावा.

आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रे:–

१. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात शिकत असल्याबाबतचे बोनाफाईड प्रमाणपत्र.
२. मागील वर्षातील गुणपत्रक.
३. धर्माबाबत पालकांचे स्वयंघोषित प्रमाणपत्र.
४. पालकांच्या उत्पन्नबाबत सक्षम प्रधिका–याचे प्रमाणपत्र.
५. रहिवाशाचा पुरावा.
६. बॅक पासबुकच्या पहिल्या पानाची झेरॉक्स.
७. विद्यार्थीनीचा स्वयंसाक्षांकित फोटोग्राफ.
८. आधारकार्ड.

सन २०२२–२३ मध्ये NSP 2.0 या पोर्टलवर नवीन अर्ज भरण्यासाठी विद्यार्थीनींचे आधार नुसार नाव, जन्मतारीख, लिंग, मोबाईल क्रमांक, आधार क्रमांक, राष्ट्रीयकृत बॅकेचे खाते क्रमांक व I.F.S.C कोड, कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न, महाविद्यालयाचे नाव व यु. डायस क्रमांक विद्यार्थीनीचे महाविद्यालयातील जनरल रजिस्टर क्रमांक, शाळेत प्रवेश घेतलेले वर्ष, हजेरी क्रमांक, तुकडी, इयत्ता, मागील वर्षी प्राप्त झालेले गुण पालकांचा व्यवसाय, पूर्ण पत्ता इ. माहिती तसेच विद्यार्थी अनाथ आहे का? अपंग आहे का? असल्यास प्रकार व टक्केवारी इ. माहिती आवश्यक आहे.

ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत:–

| अ. क. | शिष्यवृत्ती योजना | नवीन/नूतनीकरण | वर्ग | मुदत |
|---|---|---|---|---|
| १. | बेगम हजरत महल राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजना | फक्त नवीन | इ. ११व १२ वी (फक्त मुली) | दि. २०/०७/२०२२ ते दि. ३०/०९/२०२२ |

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य